## मनोगत

आतमधे मळभ असतंच. काहीतरी साचत असतं.
रुजत असतं. उगवत असतं आतल्याआत.
पण अनेक पावसाळे भोगून झाल्यानंतर
रुजण्या-उगवण्याचे, फुलण्या-गळण्याचे नावीन्य ओसरते.
नकळत एक तटस्थ अवस्था येते.
किंवा मख्ख थकलेपण.
पिकलेली फळं पडतात आतल्याआत
पण ती उचलून कुणाला द्यावी-दाखवाविशी वाटत नाहीत
आतली स्वगतं निमूट पडून असतात..!

अचानक मरगळ वितळते...

चक्राकार गतीत फिरणार्याू
त्याच त्या घटनांमध्ये ताजेपण जाणवतं.
तो क्षण नव्याने स्वतःला भेटवणारा असतो.
संवाद सुरू होतो पुन्हा.. मळभही बोलू लागतं...
स्वगतांचे ठिपके उमटू लागतात अभिव्यक्तीच्या अंगणात
रांगोळ्या रेखल्या जाऊ लागतात
आत निमूट पडून राहिलेली स्वगतं
रांगोळीत मिसळून मुक्त होतात
तेव्हा त्यांच्याही नकळत
त्यांच्या कविता झालेल्या असतात..!

**आसावरी काकडे**